**<u>ठळक बातम्या</u>**

- सनदी अधिकाऱ्यांच्या नागरी सेवेबद्दलच्या वचनबद्धतेमुळे सार्वजनिक संस्था आणि प्रशासन बळकट होतं असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर चालू आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा संयुक्त राष्ट्रांचा अंदाज

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा आणि तमिळनाडू मधे आज प्रचाराचा अखेरचा दिवस

**आणि**

- भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं निधन

**<><><><><>**

देशभरात आज नागरी सेवा दिवस साजरा होत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व सनदी अधिकाऱ्यांना नागरी सेवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

सनदी अधिकाऱ्यांच्या नागरी सेवेबद्दलच्या वचनबद्धतेमुळे सार्वजनिक संस्था आणि प्रशासन बळकट होतं असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. जनकेंद्री, नाविन्यपूर्ण धोरणं आखण्यापासून ते त्यांची अंमलबजावणी करण्यापर्यंत सनदी अधिकारी महत्त्वाचं काम करतात, या कामाचा थेट परिणाम लोकांच्या आयुष्यावर होतो, असं त्यांनी यात अधोरेखित केलं.

सरकारच्या योजना आणि धोरणांची अंमलबजावणी तळागाळापर्यंत पोहोचवण्यात सनदी अधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं नागरी सेवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. योजना किंवा धोरणं दिल्लीत आखली जातात, मात्र त्याची अंमलबजावणी खेड्यापाड्यात योग्य रीतीनं झाली, तरच त्याचा अपेक्षित परिणाम होतो, असं ते यावेळी म्हणाले. राधाकृष्णन यांनी यावेळी देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचा नागरी

सेवेचे जनक म्हणून गौरव केला, सरदार पटेल यांनी संपूर्ण देशाला सेवा आणि एकतेच्या भावनेनं जोडलं, असं ते म्हणाले. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं.

नागरी सेवा दिनाच्या निमित्तानं सुशासन आणि राष्ट्र उभारणीच्या दिशेनं काम करण्याचा संकल्प करायला हवा, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. धोरणनिर्मितीपासून अंमलबजावणीपर्यंत सनदी अधिकाऱ्यांचं योगदान असल्यामुळे ते देशाच्या प्रगतीत महत्त्वाचं योगदान देतात असं त्यांनी नमूद केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही सनदी अधिकाऱ्यांना नागरी सेवा दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत नागरी सेवा दिनानिमित्त कार्यक्रम झाला. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धेची पारितोषिकं प्रदान करण्यात आली. राज्यात  सरकार स्थापन झाल्यानंतर  पहिल्या शंभर आणि नंतर दीडशे दिवसांचा कार्यक्रम आखून प्रशासकीय सुधारणा राबवल्या गेल्या, असं असं ते यावेळी म्हणाले. सरकारने ई गव्हर्नन्सवर भर दिला, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ केल्या, असं ते म्हणाले.

<><><><><>

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर चालू आर्थिक वर्षात   ६ पूर्णांक ४ दशांश टक्के तर पुढच्या आर्थिक वर्षात ६ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील असा अंदाज संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आशिया आणि पॅसिफिकसाठीच्या आर्थिक आणि सामाजिक आयोगाने काल हा अहवाल प्रसिद्ध केला. ग्रामीण अर्थव्यवस्थेतली उपभोग दरातली वाढ, जीएसटी मधली दरकपात आणि अमेरिकेच्या शुल्क आकारणीपूर्वी केलेली निर्यातवाढ यांमुळे २०२५-२६ या आर्थिक वर्षातली भारताची वाढ ७ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून तीन दिवस जर्मनी दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात, ते जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस यांच्याशी, द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. संरक्षण क्षेत्रात औद्योगिक सहकार्य वाढवणे, लष्करी स्तरावर परस्पर संबंध अधिक दृढ करणं

तसंच, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोन यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमधे संधींचा शोध घेण्यावर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा अपेक्षित आहे.

<><><><><>

एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा असलेल्या JEE मेन, सत्र २ चे निकाल जाहीर केले आहेत. यंदा एकूण २ लाख ५० हजार १८२ उमेदवार JEE Advanced साठी पात्र ठरले आहेत.

<><><><><>

उन्हाळी सुट्टीमुळे  प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन  भारतीय रेल्वे देशभरात १८ हजार २६२ उन्हाळी विशेष गाड्या चालवणार आहे.  १५ एप्रिलपासून ते १५ जुलैपर्यंत एकूण ९०८ उन्हाळी विशेष गाड्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

<><><><><>

पश्चिम बंगाल मधे विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला प्रचार आज संपेल. या पार्श्वभूमीवर, मतदारांशी संवाद साधण्यासाठी विविध राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक झंझावाती दौरे करत आहेत.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज पश्चिम बंगालमधील सिलिगुडी, पश्चिम बर्धमान, पश्चिम आणि पूर्व  मेदिनिपुर जिल्ह्यातील उमेदवारांसाठी प्रचार सभा घेत आहेत. तर, तृणमूल कॉंग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी, पूर्व मेदिनिपुर, बरांकपोर आणि जगदताल इत्यादी ठिकाणी प्रचार सभा घेतील.

येत्या गुरुवारी होणाऱ्या मतदानाचं थेट वेब कास्टिंग करण्यासाठीची तयारी प्रशासनानं केली असून आज त्याची तालीम घेण्यात येत आहे. यावेळी प्रथमच या टप्प्यातल्या सर्व मतदान केंद्रांवरुन मतदान प्रक्रियेचं वेबकास्टींग होणार असून निवडणूक आयोग आजच्या तालमीचं थेट निरीक्षण करणार आहे.

<><><><><>

तामिळनाडूमध्ये मतदानाला आता केवळ दोन दिवस उरले आहेत. येत्या 23 तारखेला एकाच टप्प्यात होणाऱ्या मतदानात, एकंदर 5 कोटी 73 लाख 43 हजार 291 मतदार, 234 मतदारसंघांसाठी आपले प्रतिनिधी निवडतील. राज्यात एकंदर 75 हजार 64 मतदान केंद्रं आणि 33 हजार 211 पूरक मतदान केंद्रं सज्ज ठेवण्यात आली आहेत, अशी माहिती मुख्य

निवडणूक अधिकारी अर्चना पटनायक यांनी दिली. प्रचाराचा आज शेवटचा दिवस असल्यानं उमेदवार हिरीरीने प्रचार करत आहेत. मुख्यमंत्री एम के स्टालिन यांनी आज आपल्या मतदारसंघाचा पायी फिरुन दौरा केला, आणि नागरिकांशी संवाद साधला.

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं आज लातूर मध्ये वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. डॉ. गोपाळराव पाटील यांनी वैद्यकीय सेवेतून समाजकारणात प्रवेश करून राजकारणात सक्रिय भूमिका बजावली. १९९४ ते २००० या काळात भाजपाचे राज्यसभा सदस्य म्हणून त्यांनी काम केलं. तसंच वाणिज्य, परराष्ट्र व्यवहार, रेल्वे यासारख्या महत्त्वाच्या संसदीय विषय समित्यांमध्ये योगदान दिलं.

शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि समाजकार्य या क्षेत्रांत त्यांनी भरीव योगदान दिलं. लातूर इथल्या शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी सुरू केलेल्या लातूर पॅटर्न नं अनेक गुणवान विद्यार्थी घडवले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांच्या निधनानं वैद्यकीय सेवा आणि शिक्षण क्षेत्रातला निस्पृह सेवाव्रती काळाच्या पडद्याआड गेल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी डॉ. पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. “लातूरच्या शैक्षणिक क्रांतीचा महामेरू हरपला,” असं त्यांनी म्हटलं आहे.

डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनानं जिल्ह्याच्या राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी लातूर मध्ये शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या क्रीडा मैदानावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये आज सनरायझर्स हैदराबादचा सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर होणार आहे. संध्याकाळी साडे-सात वाजता हैदराबाद इथल्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना होईल.

काल मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सचा ९९ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत पाच गडी गमावून १९९ धावा केल्या. तिलक वर्माला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

//<><><><><>//